# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
# वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 19.08.2025** **वार- मंगळवार**

---

**पाऊस**

पुणे शहर आणि जिल्ह्याला आज मुसळधार पावसानं झोडपून काढलं. या पावसामुळे जनजीवन विस्कळीत झालं असून शहरातले अनेक रस्ते जलमय झाले आहेत. ठीकठिकाणी वाहतूक कोंडी झाल्याचं चित्र आहे.

खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात मुसळधार पाऊस सुरू असून धरणातून मुठा नदी पात्रामध्ये सुरू असलेल्या विसर्गात मोठ्या प्रमाणात वाढ करण्यात आली आहे.

पिंपरी चिंचवड शहर परिसरात आणि धरणाच्या पाणलोट क्षेत्रातही पावसाची संततधार सुरू आहे. धरणामधून करण्यात येणाऱ्या विसर्गामुळे नद्यांच्या पाणीपातळीत वाढ होत आहे. या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या नागरिकांनी सतर्क रहावं असं आवाहन महापालिका प्रशासनानं केलं आहे. नागरिकांना सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित करावं लागलं, तर त्यांना सर्व आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी संबंधित विभागाने तात्काळ कार्यवाही करावी, जलद प्रतिसाद पथकाने दिवसरात्र नदीकाठ परिसरावर लक्ष ठेवावं असे निर्देश महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिले आहेत.

**हवामान**

दरम्यान येत्या २४ तासातही पुणे शहर परिसरात जोरदार पावसाचा अंदाज आहे. तर पुणे घाट क्षेत्रात तुरळक ठिकाणी अतिमुसळधार पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

**स्वयंचलितहवामानकेंद्र**

केंद्र सरकारच्या विण्ड्स म्हणजे वेदर इन्फॉर्मेशन नेटवर्क डाटा सिस्टिम प्रकल्पाअंतर्गत ग्रामपंचायत स्तरावर स्वयंचलित हवामान केंद्र सुरु करण्यात येत आहेत. या द्वारे हवामानविषयक अचूक माहिती संकलित करून शेतकऱ्यांना मार्गदर्शन मिळणार आहे. पुणे जिल्ह्यात 1 हजार 390 ग्रामपंचायतीमध्ये हे केंद्र कार्यान्वित करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी संजय काचोळे यांनी दिली.

**<u>पाणी पुरवठा</u>**

पुणे महापालिकेच्या बंडगार्डन पाणीपुरवठा विभागात अत्यावश्यक देखभाल दुरुस्तीच्या कामांमुळे येत्या गुरुवारी या केंद्रातून होणारा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. यामुळे येरवडा, संगमवाडीसह विविध भागांचा पाणीपुरवठा बंद राहणार आहे. शुक्रवारी सकाळी उशिरा आणि कमी दाबानं पाणीपुरवठा होणार असल्याचं पुणे महापालिकेनं कळवलं आहे.

**<u>आरोग्यसेवा</u>**

महाराष्ट्र शासनाच्या आरोग्य सेवा आयुक्तालयामार्फत नुकत्याच जाहीर करण्यात आलेल्या एप्रिल आणि मे महिन्याच्या आरोग्य कार्यक्रमांच्या क्रमवारीत पिंपरी चिंचवड महापालिका राज्यात अव्वल स्थानावर आहे. या क्रमवारीत मातृत्व आरोग्य, बाल आरोग्य, लसीकरण, कुटुंब नियोजन, आयुष्मान भारत आणि आरोग्य कल्याण केंद्रे, एचआयव्हीएस, आशा कार्यक्रम तसंच प्रशासन आणि वित्तीय व्यवस्थापन अशा महत्त्वाच्या निर्देशकांचा समावेश होता.

**<u>उड्डाणपूल</u>**

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ चौकातील दुमजली उड्डाणपुलाचं लोकार्पण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्या बुधवारी  करण्यात येणार आहे. या भागातील वाहतूक कोंडी दूर करण्यासाठी पर्यायी व्यवस्था म्हणून २७७ कोटी रुपये खर्चाच्या या उड्डाणपुलाची उभारणी करण्यात आली आहे. उद्या हा उड्डाणपुल रहदारीसाठी खुला करण्यात येईल.

**<u>गणेशोत्सव</u>**

ग्लोबल गणेश फेस्टिव्हलमध्ये झालेल्या ग्लोबल गणेश करंडक २०२४ या जागतिक स्पर्धेत स्पेनचं बार्सिलोना इथलं महाराष्ट्र मंडळ आणि युगांडाचं बेंजामिन तुमवेसीगये मंडळ विजेतं ठरलं. या स्पर्धेचा बक्षीस वितरण समारंभ लवकरच होणार असल्याचं आयोजकांनी कळवलं आहे.

**खड्डेमुक्तरस्ते**

गणेशोत्सवासाठी पुणे महापालिका मध्य भागातील पेठांसह त्या भागांना जोडणारे रस्ते खड्डेमुक्त करणार आहे. त्याचबरोबर सार्वजनिक स्वच्छतागृहाची रोज तीन वेळा स्वच्छता केली जाणार आहे. विविध ठिकाणी ४०० ते ५०० फिरत्या स्वच्छतागृहांची सोय केली जाणार आहे. विसर्जन घाट स्वच्छ केले जाणार आहेत. गणेशोत्सवाच्या पाश्वभुमीवर पुणे महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त जे. एम प्रदीप चंद्रन, पृथ्वीराज बी.पी. यांनी आज विभाग प्रमुखांची बैठक घेतली. त्यावेळी हे महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.

**आवाहन**

मिळकतकर कमी करून देण्याचे किंवा थकबाकी कमी करून देण्याचे  खोटे दावे करून, नागरिकांकडून पैसे उकळणाऱ्या व्यक्तींशी कुठल्याही प्रकारची आर्थिक देवाण घेवाण करू नये असं आवाहन पुणे महापालिकेनं केलं आहे. आपला मिळकत कर पुणे महापालिकेच्या अधिकृत संकेतस्थळावरून किंवा पालिकेच्या नागरी सुविधा केंद्रातून भरावा असं आवाहन महापालिकेनं केलं आहे.

**काव्यसंमेलन**

पिंपरीतील आर्य समाज संस्थेच्या वतीने गेल्या २५ वर्षांपासून राज्यस्तरीय श्रावणधारा कविसंमेलन आयोजित केलं जातं. तसंच सामाजिक कार्यकर्त्यांना गौरवण्यात येतं. यंदाचं रौप्य महोत्सवी राज्यस्तरीय श्रावणधारा कविसंमेलन आणि कार्यगौरव पुरस्कार सोहळा  नुकताच झाला. नांदेड इथल्या ज्येष्ठ लेखिका वर्षाराणी मुस्कावाड या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होत्या. समाजभान जपणाऱ्या कवींना आणि  सामाजिक कार्यकर्त्यांना पुरस्काराच्या रूपानं प्रोत्साहन देण्याचं आर्य समाज संस्थेचं काम अभिमानास्पद आहे, असं त्या म्हणाल्या.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता ताज्या पुणे वृत्तांतमध्ये. नमस्कार**